# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड

जा.क्र.कृसंके/ठेका /2487/२०२२ दिनांक – 25 NOV 2022

**निविदा सुचना (Tender Notice)**

भात पैदास विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड या संशोधन केंद्राच्या प्रयोगशाळेमधील कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत. इच्छुक ठेकेदारांनी **मा. भात पैदास विभाग, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, रायगड** यांचे नावे आपले दरपत्रक सिलबंद लखोटयातून **दिनांक** ०९.१२.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावे.

| अ. क | कामाची यादी | कालावधी | ठेक्याची रक्कम (रू) |
|---|---|---|---|
| १ | प्रयोग शाळेतील उपकरणाची साफसफाई व देखभाल करणे. | १२/१२/२०२२ ते ३१/०३/२०२३ | ७०,०००/– |
| २ | प्रयोग शाळेतील उपकरणे हाताळणे व मदत करणे. | | |
| ३ | प्रयोग शाळा स्वच्छ व निटनेटकी ठेवणे. | | |
| ४ | प्रयोगशाळेतील काचेचे साहित्य व इतर वस्तु स्वच्छ व सुरक्षीत ठेवणे. | | |
| ५ | प्रयोगशाळेतील विविध विद्युत मशिन हाताळण्यास मदत करणे | | |
| ६ | प्रयोगशाळेतील रसायणे हाताळण्यास व साठवणुक करण्यास मदत करणे. | | |
| ७ | स्पीड ब्रिडींग प्रयोगशाळेत प्रो ट्रे गांडूळखताने भरणे. | | |
| ८ | स्पीड ब्रिडींग प्रयोगशाळेत प्रो ट्रे मध्ये भात वाणाची पेरणी करणे. | | |
| ९ | स्पीड ब्रिडींग प्रयोगशाळेतील प्रो ट्रे मध्ये भात वाणांना पाणी देणे. | | |
| १० | स्पीड ब्रिडींग प्रयोगशाळेची देखभाल करणे | | |
| ११ | विविध सुधारीत व संकरीत भात जातीचे क्रॉसिंग करण्यास मदत करणे. | | |
| १२ | क्रॉसिंग करण्याकरीता नर वाणाच्या कणश्या काढणे. | | |
| १३ | क्रॉसिंग केलेलया कुंडयांना पाणी देणे. | | |
| १४ | विविध भात जातीचे नमुने काढण्यास व त्याची योग्य प्रकारे साठवणूक करण्यास मदत करणे. | | |
| १५ | विविध भात जातीचे व प्रयोगाच्या नंबरचे निरीक्षणे घेण्यास मदत करणे. | | |
| १६ | स्पीड ब्रिडींग मधील मुख्य झाडे सोडून आलेले बाकीचे फुटवे काढून टाकणे. | | |
| १७ | विविध भात जातींचे प्रयोग, महाराष्ट्र ट्रायल, स्ट्रेशन ट्रायल, ॲक्रिप ट्रायल, प्रोडक्ट टेस्टिंग ट्रायलच्या नंबरच्या कणशातील दाणे मोजणे, त्याची वजने घेण्यास मदत करणे. | | |

कामासंबंधीच्या अटी व शर्ती सोबत देण्यात आलेल्या आहेत.

जा.क्र.कृसंके/टायपींग व तत्सम कामे/ /२०२२
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड.
पिन कोड – ४१० २०१
दिनांक –

25/11

**सहयोगी संशोधन संचालक,**
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत जि. रायगड.

प्रत – प्रसिध्दीसाठी रवाना –

१. कार्यालय नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत (रायगड).
२. मा. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
३. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४. मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
५. विद्यापिठ वेबसाईट. www.dbskkv.org

# संमती पत्रक

मी खाली सही करणार श्री/श्रीमती.......................................................................... रा. .......
...................................... लिहून देतो/देते की प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड अंतर्गत भात पैदास विभागाच्या प्रक्षेत्रावर दरपत्रकात नमूद केलेली कामे करण्यास मी तयार असून या बाबतच्या खालील अटी आणि शर्ती मला मान्य आहेत.

१) प्रक्षेत्रावरील शेती विषयक कामे संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२) कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केलेबाबतच्या दाखला जोडणे आवश्यक आहे.

३) निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४) ठेकेदाराकडे स्वत:चे पॅन कार्ड व बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५) ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६) ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहित कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

७) ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

८) याचिका क्र.१५९१/२०१८ संदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र.५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

९) ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

१०) ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

११) ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१२) कामाची वेळ सकाळी ८.०० ते १२.३० आणि दुपारी २.०० ते ५.३० अशी राहील.

१३) ज्या दिवशी ठेकेदार गैरहजर राहणार त्यावेळी पुर्व सुचना देणे बंधनकारक राहील.

१४) प्रक्षेत्रावरील कामे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सुचनेनुसार करावयाची आहेत.

१५) कामाची गरज संपल्यावर कोणत्याही प्रकारची लेखी पूर्वसुचना न देता ठेका पध्दत रद्द केली जाईल.

१६) प्रक्षेत्रावर काम करत असतांना कोणत्याही कारणाने व कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास सदरील अपघातास हे केंद्र जबाबदार राहणार नाही.

वरील अ.क्र. १ ते १६ मध्ये नमुद केलेल्या अटी व ार्ती मला मान्य आहेत. सदर करारनामा मी स्वखुशीने व कोणतेही दडपण न घेता लिहून देत आहे.

दि.

ठिकाण:

सही, नाव व पत्ता

..............................................

..............................................